# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचेकार्यालय

रामनगरसुष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे

दुरध्वनीक्र. ०२२-२९४५१००१

E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्रमांक - १२१/२०२५ दिनांक १४/०३/२०२५

## प्रेसनोट

**ज्वेलर दुकानदारास सोने खरेदीचा बहाणा करुन दुकानातुन सोन्याची चैन फसवणुक करुन घेवुन पळुन जाणाऱ्या आरोपीतास २४ तासाच्या आत अटक - गुन्हे शाखा कक्ष-०१, काशिमिरा यांची कामगिरी**

----ooooo----

यातील फिर्यादी श्री विष्णु किसनलाल राठोड, यांच्या शुभ लक्ष्मी ज्वेलर्सच्या दुकानातुन दिनांक १२/०३/२०२५ रोजी १७.१५ ते १७.३० वाजेच्या सुमारास एका अनोळखी इसमाने १ तोळा व त्यावरील सोन्याच्या चैन दाखविण्यास सांगीतले असता, फिर्यादी यांनी त्यास १ तोळा व त्यावरील चैन दाखवित असतांना त्यास १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन पसंत आली म्हणुन, त्याने ती चैन गळयात घातली व म्हणाला की, "बाहर मेरा साला खडा है उसको चैन दिखाके आता हुँ " असे बोलुन दुकानाचे बाहेर गेला. व बाहेर उभ्या असलेल्या त्याच्या साथीदाराच्या स्कुटीवर पाठीमागे बसला, व ते दोघे स्कुटीवरुन पळुन गेले. तेव्हा फिर्यादी यांची दोन अनोळखी इसमांनी आपआपसात संगनमत करुन सोन्याची चैन घेण्याचे बहाण्याने दुकानातील ८०,०००/- रुपये किमतीची १२ ग्रॅम वजनाची सोन्याची चेन घेवुन जावुन फसवणुक केली म्हणुन फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारी वरुन **मिरारोड पोलीस ठाण्यात गु.रजि.क्र.** १०७/२०२५,भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३१८(४), ३(५) प्रमाणे. दाखल करण्यात आलेला आहे.

मा. वरीष्ठांचे आदेशाप्रमाणे वरील प्रमाणे दाखल गुन्हयाचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष-०१ काशिमीरा करित असतांना सि.सि.टि.व्ही. फुटेजचे तांत्रीक विश्लेषण व मिळालेल्या माहीती वरुन सदरचा गुन्हा करणारा संशयीत इसम अंश साहिल राज याने केलेला असल्याचे निष्पन्न झाल्याने तो रेल्वेने प्रवास करीत असल्याने त्यास उधना रेल्वे (सुरत) पोलीसांच्या मदतीने दिनांक १३/०३/२०२५ रोजी उधना सुरत येथुन ताब्यात घेण्यात आले असुन आरोपीत नामे अंश साहिल राज, वय-२१ वर्षे, व्यवसाय- नोकरी, रा. , मिरा-भाईंदर रोड, एस.के. स्टोन पोलीस चौकी समारे, पुनम गार्डन, मिरारोड पुर्व, ता.जि. ठाणे यास गुन्हे शाखा कक्ष-१, काशिमीरा येथे आणुन त्यास गुन्हयांचे संबधाने विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा त्याचा साथीदार नितेश प्रमोद शर्मा याचे मदतीने केलेला निष्पन्न झाले आहे.

**आरोपीत अंश साहील राज याचा पुर्वाभिलेख तपासुन पाहता त्याचे विरुध्द खालील गुन्हे नोंद आहे.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर |
|---|---|---|
| १ | मिरारोड पोलीस ठाणे | २२९/२०२३ भा.द.वी.सं. कलम ३२४, ३२३, १४३, १४७, १४८ प्रमाणे |
| २ | मिरारोड पोलीस ठाणे | ३६३/२०२४ बी.एन.एस.कलम ११८(१), १८९(१), १८९, १९०,१९१(२), १९१(३), ३५२,३५१,(३), सह आर्म ॲक्ट ४,२५ सह मपोअधि३७, १३५ |

आरोपीत नामे - अंश साहिल राज यास पुढील कारवाई कामी मिरारोड पोलीस ठाण्यात हजर करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त साो, मा. श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त साो, मा. श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप-आयुक्त गुन्हे, मा. श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त साो, गुन्हे शाखा, यांचे मार्गदर्शना खाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीरा येथील प्र.पो.निरी प्रमोद बडाख, पो.उप-निरी. उमेश भागवत, पो.उप-निरी संदीप शिंदे, सहा.पो.उप-निरी. अशोक पाटील, पो.हवा./अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, मनोज चव्हाण, अश्विन पाटील, सचिन हुले, पो. अंमलदार/प्रशांत विसपुते, धिरज मेंगाणे, पो.अं./गौरव बारी, तसेच स.फौज. संतोष चव्हाण सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.

